# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १७२-२२** **दिनांक :- ०९/०६/२०२२**

## अवैध गावठी बनावटीचे पिस्तुल बाळगणारे आरोपींवर गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांची कारवाई.

दिनांक ०८/०६/२०२२ रोजी गुन्हे शाखा युनिट-२ कक्षाचे अधिकारी/अंमलदार यांना विश्वसनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, तुंगारेश्वर ब्रिजचे बाजुला, मुंबई अहमदाबाद हायवे, वसई पुर्व येथे दोन ईसम गावठी बनावटीचे पिस्तुल विक्री करण्याकरीता आणणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा कक्ष-२ वसईचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे यांचे नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पथक रवाना होवून त्यांनी संशईत नामे १) मंगलाराम पुनभाजी सोलंखी वय २२ वर्ष रा. मु. पो आमलरी, ता. जि. सिरोही, राज्य-राजस्थान २) महेंद्र हिरजी पटेल वय २२ वर्ष रा. नंदिवेला, उदयुपर, सुलावास, राज्य-राजस्थान यांना ताब्यात घेवून अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात ७५,४००/- रु किंमतीचे गावठी बनावटीचे १ पिस्तुल व दोन जिवंत काडतूसे असे मिळून आल्याने पंचांचे समक्ष सविस्तर पंचनामा करुन आरोपीतांस त्यांच्या ताब्यातील एकुण ७५,४००/- रु किंमतीच्या गावठी बनावटीचे १ पिस्तुल, २ जिवंत काडतुसे आणि २ मोबाईल असा मुददेमाल ताब्यात घेतला आहे. सदर आरोपींविरुध्द पो.हवा./९५०२१ मंगेश विठ्ठल चव्हाण नेम. गुन्हे शाखा-२ वसई युनीट, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद दिली असुन त्याबाबत वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ५७९/२०२२ आर्म ॲक्ट ३, २५(१)(बी) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आलेला असून सदर आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री. शाहुराज रणवरे, सपोनिरी/सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/रमेश भोसले, पो.हवा. मंगेश चव्हाण, संजय नवले, चंदन मोरे, प्रशांत पाटील, जगदीश गोवारी, पोकॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी केली आहे.


गुन्हे शाखा
कक्ष-२, वसई
ZARAMA